जा.क्र. पोआ/ ९८२४ /२०२१
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
दिनांक २२.०२.२०२१

विषय :- कोरोना विषाणूमुळे उदभवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश.

२) ज्याअर्थी मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे, यांचेकडील परिपत्रक क्र.सा.प्र.२/आर आर/५१/२०२१ दिनांक ०५.०१.२०२१ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे (मिशन बिगिन अगेन) संदर्भात कोविड-१९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

३) आणि ज्याअर्थी सदर अधिनियमांअतर्गत राज्यात कोरोना विषाणूमूळे उदभवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांना प्राधिकृत केलेले आहेत. साथरोग बधिनियम १९८७ व अपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी कृष्ण प्रकाश पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या क्षेत्रात खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करीत आहे.

४) त्याअर्थी **मी कृष्ण प्रकाश, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** तथा सक्षम अधिकारी शासनाच्या अधिसुचनेव्दारे सक्षम अधिकारी म्हणुन प्राप्त अधिकारान्वये व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे अधिकारानुसार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूमुळे उध्दभलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश दिनांक २१.०२.२०२१ चे ००/०१ वा. पासुन पुढील आदेशापर्यंत लागु करीत आहे.

अ) पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या क्षेत्रातील सर्व शैक्षणिक संस्था,प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये यांचे नियमीत वर्ग तसेच खाजगी शिकवणी वर्ग या आदेशाच्या दिनांका पासून दिनांक २८.०२.२०२१ पर्यंत पुर्णतः बंद राहतील.

ब) पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या क्षेत्रातील सर्व आभ्यासिका ५०% क्षमतेने (Social Distancing) व Sanitization चे नियम काटेकोरपने पाळुन सुरू राहतील.

क) मंगल कार्यालय / सभागृह / खुले मैदान अथवा बंधिस्त ठिकाणी २०० व्यक्तींच्या किंवा आसन क्षमतेच्या ५०% क्षमता यापैकी जे कमी असेल तेवढया उपस्थितीत लग्न समारंभ करणेस परवानगी राहील. वर वधु, पालक/आयोजक यांनी पोलीसांचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकाकरक राहिल. तसेच आयोजक कोविड-१९ च्या नियमांचे पुर्ण पालन करणेबाबत लेखी स्वरूपात हमी पोलीसांना देतील.

ड) पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे क्षेत्रातील सर्व मंगल कार्यालये, हॉल, लॉन्स, सांस्कृतिक सभागृह, सर्व सामाजिक,धार्मिक, राजकीय, क्रिडा, मनोरंजन, सांकृतिक शैक्षणिक उपक्रम, सभा, संमेलन, नाटयगृह, चित्रपटगृह, शॉपिंग मॉल, धार्मिक स्थळे, उद्याने व तत्सम मोठया संख्येने लोक एकत्र येवु शकतील अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे ठिकाणी, सर्व नागरिकांनी संचार करताना मास्क, थर्मलस्कॅनर, ऑक्सीमीटर व सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक आहे. सर्व प्रकारच्या कार्यकमांना सबंधीत पोलीस ठाणेची परवानगी घेणे बंधनकाकरक आहे. त्याच प्रमाणे या पुर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशा नुसार उपरोक्त नमुद सर्व ठिकाणी नागरिकांची गर्दी होणार नाही याची दक्षता संयोजकांनी घ्यावी. तसेच आयोजक कोविड-१९ च्या नियमांचे पुर्ण पालन करणेबाबत लेखी स्वरूपात हमी पोलीसांना देतील. पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे क्षेत्रातील सर्व मनपा कार्यालये, सरकारी व खाजगी कार्यालयामध्ये मास्क व सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक राहिल.

Scanned with CamScanner

इ) सर्व हॉटेल, रेस्टॉरन्ट, बार, फुड कोर्ट रात्री ११.०० वाजे पर्यंत सुरू राहतील. तसेच मास्क, थर्मलस्कॅनर, ऑक्सीमीटर व सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक आहे.

ई) पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे क्षेत्रात कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक कारण / सेवा वगळता दिनांक २२.०२.२०२१ रोजी पासुन रात्री ११.०० ते सकाळी ०६.०० या वेळेत संचार करणेस प्रतिबंध असेल. या मधुन जिवनावश्यक वस्तुंचा (दुध, भाजीपाला,फळे इ.) वृत्तपत्र सेवा व आत्यावश्यक सेवा पुरविणा-या आस्थापना / व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना वगळण्यात येत आहे.

उ) पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे क्षेत्रात नागरिकांनी संचार करताना मास्कचा वापर करणे अनिवार्य असुन सामाजिक अंतर (Social Distancing) व Sanitization च्या नियमांचे कोकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

ऊ) यापुर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व मार्गदर्शक सुचना नुसार पुढील आदेशापर्यंत सुरू राहतील.

५) कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कायालयाव्दारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सुचनांचे उलंघन करणारी व्यक्ती अपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतिय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशिर तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश दिनांक २१.०२.२०२१ पासुन पुढील आदेशापर्यंत पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक २१.०२.२०२१ रोजी दिलेला आहे.

(कृष्ण प्रकाश)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :- २२.०२.२०२१

Scanned with CamScanner